**ठळक बातम्या**

- यूपीआय व्यवहारांवरची शुल्क आकारणी दिवाळीनंतर लागू होणार

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा

- मुंबई विमानतळावरच्या T1 टर्मिनलवरची वाहतूक नवी मुंबईत हलवण्याच्या निर्णयाला मार्चपर्यंत स्थगिती

- भारतातून सौदी अरेबियाला जाणाऱ्या विमानांची उड्डाणं शनिवारपर्यंत स्थगित

आणि

- सेन्सेक्समध्ये अकराशे अंकांची वाढ, गेल्या ४ महिन्यातली सर्वात मोठी तेजी

<><><><><>

यूपीआय व्यवहारांवरचं MDR शुल्क दिवाळीनंतर लागू करायचा निर्णय यूपीआय आणि सेवा सुकाणू समितीनं घेतला आहे. हे शुल्क १५ ऑक्टोबरपासून लागू होणार होतं, मात्र आगामी सणासुदीचा विचार करून हा निर्णय पुढे ढकलला आहे. निवडक पर्सन टू मर्चंट व्यवहारांवर हे शुल्क लागू असेल. ते नेमकं कधीपासून लागू होणार, ती तारीख नंतर कळवली जाईल, असं नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियानं म्हटलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांच्याशी संवाद साधला. या दोन्ही देशांमधले संबंध आणखी वाढवण्यावर, तसंच व्यापार, ऊर्जा, तंत्रज्ञान, संरक्षण आणि नागरिकांमधले संबंध इत्यादी क्षेत्रांमध्ये धोरणात्मक भागीदारी बळकट करण्यावर दोन्ही नेत्यांनी सहमती दर्शवल्याची माहिती प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात दिली. अधिक स्थिर आणि समृद्ध जग उभारण्यात हे दोन्ही देश मोठं योगदान देत असल्याचंही त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

भारताची प्रगती सामूहिक विकास आणि सर्वांना समान संधी उपलब्ध करून देण्याच्या तत्त्वावर आधारित आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज नवी

दिल्लीत आयोजित ब्लूमबर्ग न्यू इकॉनॉमी फोरममध्ये बोलत होते. जगात अनिश्चितता असतानाही भारताची आर्थिक प्रगती भक्कम पायावर होत असल्याचं त्यांनी सांगितलं. भारताची क्षमता इतर देशांसाठीही नव्या संधींची दारं खुली करेल, यासाठी सरकार सातत्यानं प्रयत्नशील असल्याचं  प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

**- - (बाईट – मोदी) - - -**

जगाला जेव्हा स्थिर आधारस्तंभाची गरज भासते, तेव्हा आपली जबाबदारी ओळखून भारत मदतीचा हात पुढे करतो. आज भारतात दोन हजारांहून अधिक जागतिक क्षमता केंद्रं कार्यरत असून, ती जगभरातील कंपन्यांना विविध सेवा पुरवत आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

भारताची लोकशाही, निवडणूक प्रक्रिया आणि राज्यघटना यांची पुनर्स्थापना करण्यासाठी विरोधी पक्ष, सामान्य नागरिक आणि विविध संघटना एकत्र येऊन लढत राहू, असा निर्धार इंडिया आघाडीनं व्यक्त केला आहे. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीनंतर इंडिया आघाडीच्या नेते आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांनी वार्ताहर परिषद घेतली. नवी दिल्लीतल्या आंदोलनस्थळांच्या यादीतून जंतरमंतर काढून टाकण्याच्या निर्णयाला आव्हान देऊ, असं राहुल गांधी यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

एसआयआरला विरोध करून घुसखोरांचा बचाव करण्याचा काँग्रेसचा डाव देशाच्या नागरिकांना कळला आहे आणि आता ते याला बळी पडणार नाहीत, असा दावा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला आहे. दिल्लीत ते वृत्तसंस्थांशी बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, भाजपा आणि एनडीएच्या पाठीशी देशाची जनता उभी असून २०२९च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्येही आपला प्रचंड विजय होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

***होल्ड… बाईट- अमित शहा***

**<><><><><>**

मुंबई विमानतळावरच्या T1 टर्मिनलवरची आंतरराष्ट्रीय उड्डाणं अंशतः नवी मुंबई विमानतळावर हलवण्याचा निर्णय अदानी एअरपोर्ट्सनं मार्च २०२७ मध्ये सुरू होणाऱ्या उन्हाळी वेळापत्रकापर्यंत पुढं ढकलला आहे.

पुढच्या वर्षी मुंबई विमानतळाच्या टर्मिनल १ चं नूतनीकरण सुरू होणार असल्यानं, विमान कंपन्यांना २५ ऑक्टोबरपासून त्यांच्या आंतरराष्ट्रीय उड्डाणांपैकी ३३ टक्के उड्डाणं कमी करायला, किंवा ती नवी मुंबई विमानतळावर हलवायला अदानी एअरपोर्ट्सनं सांगितलं होतं. संबंधित विमान कंपन्यांनी याला विरोध दर्शवल्यानंतर, AAHL चं वरिष्ठ नेतृत्व आणि इतर अधिकाऱ्यांनी आज मुंबईत एअरलाइन ऑपरेटर्स कमिटीच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. त्यानंतर हा निर्णय घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली.

<><><><>

आखाती देशात सुरु असलेल्या घडामोडी लक्षात घेत, सौदी अरेबियाला जाणाऱ्या विमानांची उड्डाणं येत्या शनिवारपर्यंत स्थगित केल्याचं इंडिगो, एअर इंडिया एक्सप्रेस, एअर इंडिया आणि आकासा एअर या विमान कंपन्यांनी आज जाहीर केलं. काही दिवसांपूर्वी रियाध विमानतळावर हुती दहशहतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यामुळे या विमान कंपन्यांनी जेद्दाह, दम्माम, मदिना, रियाध या शहरांना जाणारी विमान उड्डाणं रद्द केली आहेत.

रियाध विमानतळावर झालेल्या हल्ल्यात जखमी झालेल्या भारतीयांपैकी ४ जणांवर रुग्णालयात तर ४ जणांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून ३ जणांना उपचारानंतर घरी पाठवण्यात आलं आहे. या हल्ल्यात एका भारतीयाचा मृत्यू झाला आहे.

सध्याची परिस्थिती लक्षात घेत सौदी अरेबियामध्ये असलेल्या भारतीय नागरिकांनी शांत आणि सतर्क राहावं, तसंच हवाई हल्ले होत असल्यास स्थानिक प्रशासनानं दिलेल्या सूचनांचं पालन करावं, असे दिशानिर्देश भारतीय दूतावासानं जारी केले आहेत. सौदी अरेबियामधल्या सध्याच्या घडामोडीबाबत कसलाही व्हिडिओ पोस्ट करू नये, असाही सल्ला देण्यात आला आहे.

<><><><>

लडाख हा भारताचा अविभाज्य भाग असून चीननं कितीही नाकारलं, तरी हे तथ्य बदलणार नाही, याचा पुनरुच्चार भारतानं केला आहे. यासंदर्भात चीननं घेतलेल्या भूमिकेवर, गृहमंत्रालयानं प्रसिद्धीपत्रक जारी केलं असून त्यात या प्रश्नाचं उत्तर स्पष्ट होत असल्याचं,

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं. भारताच्या सर्वेक्षणाच्या अधिकृत नकाशात लडाखमधल्या २८ जागांचा आणि त्यांच्या नावांचा स्पष्ट उल्लेख आहे. लडाख प्रशासन आणि स्थानिकांशी चर्चा करून हा निर्णय घेतला आहे, असंही जयस्वाल यांनी सांगितलं.

<><><><><>

भारत आणि सायप्रस यांच्यात आज नौदल ते नौदल सहकार्यावर चर्चा झाली. संरक्षण सचिव राजेश कुमार सिंग यांच्या नेतृत्वाखालचं भारतीय संरक्षण शिष्टमंडळ आणि सायप्रस नौदल कमांडचे कमांडर कमोडोर निकोलाओस लुका यांच्यात ही चर्चा झाली. राजेश कुमार सिंग सध्या दोन दिवसांच्या सायप्रसच्या दौऱ्यावर आहेत.

<><><><><>

माहिती तंत्रज्ञान, वित्त आणि ग्राहकोपयोगी वस्तू क्षेत्रातल्या कंपन्यांच्या समभागात झालेली वाढ, वधारलेला रुपया आणि कॅपिटल गेन कराच्या संदर्भात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलेल्या वक्तव्यामुळं देशातल्या शेअर बाजारात आज जोरदार तेजी झाली. सेन्सेक्स १ हजार १०९ अंकांनी वधारून ७३ हजार ३४ अंकांवर स्थिरावला. एकाच दिवसात झालेली सेन्सेक्समधली गेल्या ४ महिन्यांतली ही सर्वात मोठी वाढ आहे. निफ्टी ३५९ अंकांनी वाढून २२ हजार ७२२ अंकांवर बंद झाला. निफ्टीतली सुद्धा ही गेल्या २ महिन्यांतली सर्वात मोठी वाढ आहे.

<><><><><>

परकीय चलन बाजारातली रुपयाच्या व्यवहारांमधली अतिरिक्त अस्थिरता दूर करण्यासाठी रिझर्व्ह बँक प्रयत्न करत राहील, असं प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं आहे. नवी दिल्लीत ब्लूमबर्ग न्यू इकॉनॉमी फोरममध्ये त्या बोलत होत्या. जागतिक पातळीवरच्या अनिश्चिततेमुळं अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयात घसरण झाली आहे. मात्र देशातली आर्थिक परिस्थिती आणि परकीय चलनसाठा मजबूत असल्याचं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं. शेअर बाजारातल्या नफ्यावर आकारला जाणारा कॅपिटल गेन कर तसंच व्यवहारांवर असलेला कर कमी करण्यासाठी सुरू असलेल्या चर्चांवर लक्ष असल्याचं त्या यावेळी म्हणाल्या.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने २०२६-२७ या वर्षात भारताचा सकल राष्ट्रीय उत्पादन दर अर्थात जीडीपीचा दर ७ टक्के पर्यंत वाढण्याचा अंदाज वर्तवला आहे. जुलै २०३६ मध्ये हा दर ६ पूर्णांक ४ दशांश राहील असा अंदाज IMF नं वर्तवला होता. अस्थिर जागतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत अनुमानापेक्षा वेगानं आर्थिक प्रगती करत असल्याचं जागतिक  आर्थिक आऊटलुक अहवालात IMF नं नमूद केलं आहे.

<><><><><>

माहिती आणि प्रसारण आणि संसदीय कामकाज राज्यमंत्री डॉक्टर एल. मुरुगन यांनी मंत्रिपदाचा आणि राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. २०२९च्या लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तमिळनाडूमध्ये भाजपला बळकट करण्यासाठी वेळ द्यायचा असल्याचं त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे.

//<><><><><>//